उदारतेचा खरा अर्थ

लेखक
सय्यद अबुल आला मौदूदी

भाषांतर
सय्यद ज़ाकिर अली

"अल्लाह, असीम कृपावंत व दयावंतच्या नावाने"

उदारतेचा खरा अर्थ

जर एकाच वस्तूस एक व्यक्ती काळी म्हणत असेल, दुसरी व्यक्ती पांढरी, तिसरी पिवळी आणि चौथी व्यक्ती लाल असल्याची म्हणत असेल तर त्यापैकी कोणतीही व्यक्ती खरे बोलत असण्याची शक्यता नाही. एकाच कामास जर कोणी चांगले काम म्हणत असेल, दुसरा वाईट असल्याचे म्हणत असेल आणि एखादी व्यक्ती त्या कामाचा आदेश देत असेल व दुसरी व्यक्ती त्यापासून रोखत असेल, दोन्ही व्यक्तींची विचारसरणी खरी असणे शक्यच नाही. जी व्यक्ती अशा परस्परविरोधी कथनाची पुष्टी करीत असेल आणि दोन्हीही कथने खरी असल्याचे मान्य करीत असेल तर त्या व्यक्तीच्या भूमिकेत दोन बाबी आढळतात. प्रथम तो सर्वांनाच खूश करीत आहे अथवा या विषयावर कोणताही विचार न करता आपली भूमिका व्यक्त करीत आहे. मात्र या दोन्ही भूमिका बुद्धी, विवेक आणि सत्याविरुद्ध असून अशा स्वरुपाची दांभिक विचारसरणी कोणत्याही बुद्धिमान आणि सत्यनिष्ठ व्यक्तीस शोभत नाही.

साधारणत: लोकांचा असा गैरसमज झालेला आहे की, दहा प्रकारच्या भिन्न विचारसरणींच्या लोकांना समर्थन करणेच उदारता आणि सहिष्णुता आहे. कोणालाही न दुखविता त्याचे खरे-खोटे विचार डोळे मिटून पचविणे हे उदारतेचे व सहिष्णुतेचे लक्षण आहे. खरी गोष्ट अशी की, ही उदारता आणि सहिष्णुता नसून चुकीची, मिथ्या आणि दांभिक नीतीच आहे. सहिष्णुता अगर उदारतेचा अर्थ असा आहे की, ज्या लोकांच्या श्रद्धा, आस्था, धार्मिक आणि इतर सर्वच प्रकारच्या भूमिका वा विचारसरणी तसेच त्यांचे कर्म हे आपल्या विचार व भूमिकांनुसार चुकीचे असून आपण ते सहन करीत आहोत, त्यांच्या भावनांचा आदर करून त्यावर अशा कोणत्याही प्रकारच्या टीका-टिप्पणी करू नये, ज्यामुळे त्यांच्या भावना दुखावत असतील त्याचप्रमाणे त्यांना त्यांच्या श्रद्धा व आस्थांची दिशा

बदलण्याकरिता आणि त्यांच्या आस्थांनुसार असलेले त्यांचे आचरण रोखण्यासाठी कोणत्याही प्रकारची बळजबरी करता कामा नये. अशा प्रकारचा संयम राखणे व अशाप्रकारे लोकांना आस्था आणि कर्मांचे स्वातंत्र्य प्रदान करणे, हे केवळ प्रशंसनीय कार्यच नसून विभिन्न विचार असलेल्या समूहांत शांती आणि संरक्षण कायम ठेवण्यासाठी अतिशय आवश्यक आहे.

मात्र आपण स्वत: जर एक स्वतंत्र श्रद्धा वा आस्था बाळगत असूनदेखील केवळ इतरांना प्रसन्न करण्याकरिता त्यांच्या विविध आस्थांचे समर्थन करीत असू किंवा एका विशिष्ट आणि स्वतंत्र जीवनव्यवस्थेचा झेंडा आपल्या हाती असताना एखाद्या आपल्यापेक्षा भिन्न जीवनव्यवस्थांचे अनुनय करणाऱ्यांना म्हणत असू की तुम्हीसुद्धा सत्यावर आहात, तर दांभिक स्वरुपाच्या भूमिकेस मुळीच सहिष्णुता किंवा उदारता म्हणता येणार नाही. एखाद्या कारणास्तव मौन पाळणे आणि जाणूनबुजून खोटे बोलणे यात काहीतरी अंतर असणे आवश्यक आहे. वास्तविक सहिष्णुता ही इस्लामनेच वर्णन केलेली सहिष्णुता आहे. ती कुरआनात अशा शब्दांत स्पष्ट करण्यात आलेली असून सहिष्णुतेच्या या परिभाषेस जगातील कोणताही सत्यनिष्ठ आणि न्यायनिष्ठ विचारवंत नाकारण्याचे धारिष्ट्य करू शकत नाही. कुरआनात म्हटले आहे,

"हे श्रद्धावंतांनो! हे लोक ईश्वरास सोडून ज्या उपास्यांना पुकारत आहेत, त्यांना वाईट शब्दांनी संबोधित करू नका. कारण ते प्रत्युत्तरादाखल नादानीच्या कारणास्तव हकनाक ईश्वरला शिव्या देतील. आम्ही तर याच प्रकारे प्रत्येक समूहासाठी त्याचे स्वत:चे कर्म सुंदर बनविले आहेत. मग त्यांना आपल्या प्रभुकडेच परत यावे लागणार आहे, त्या वेळी पालनकर्ता ईश्वर त्यांना दाखवून देईल की ते काय करीत होते." (कुरआन - ६ : १०८)

"सांगा की, हे अश्रद्धावंतांनो, मी त्यांची उपासना करीत नाही ज्यांची उपासना तुम्ही करता. आणि न तुम्ही त्याची उपासना करणारे आहात ज्याची उपासना मी करतो. आणि न मी त्यांची उपासना करणारा आहे

ज्यांची उपासना तुम्ही केली आहे. आणि न तुम्ही त्याची उपासना करणारे आहात ज्याची उपासना मी करतो. तुमच्यासाठी तुमचा धर्म आहे आणि माझ्यासाठी माझा धर्म.'' (कुरआन - १०९ : १-६)

''धर्माच्या बाबतीत कोणतीही बळजबरी नाही.''

(कुरआन - २:२५६)

''दयावान प्रभुचे नेक बंदे ते आहेत, जे खोटी साक्ष देत नाही आणि जेव्हा कोण्या वाईट बाबीवरून त्यांचे जाणे झाले तेव्हा सज्जन माणसाप्रमाणे निघून जातात.' (कुरआन - २५:७२)

''हे ते लोक आहेत ज्यांना त्यांचा मोबदला दोन वेळा दिला जाईल, त्या दृढतेबद्दल जी त्यांनी दाखविली. ते वाईटाचे भल्याने निवारण करतात आणि जी काही उपजीविका त्यांना आम्ही दिली आहे, त्यातून ते खर्च करतात, आणि जेव्हा त्यांनी बाष्कळ गोष्ट ऐकली तेव्हा हे सांगून त्यापासून अलिप्त झाले की, ''आमची कृत्ये आमच्यासाठी आणि तुमची कृत्ये तुमच्यासाठी, तुम्हाला सलाम आहे. आम्ही असभ्य लोकांसारखी पद्धत अनुसरू इच्छित नाही.'' (कुरआन - २८:५४,५५)

''आपल्या प्रभुच्या मार्गाकडे तत्त्वदर्शिता आणि सदोपदेशाद्वारे बोलवा आणि त्यांच्याशी उत्तम तऱ्हेने संवाद साधा.'' (कुरआन - ६:१२५)

''(ज्या अर्थी अशी स्थिती निर्माण झाली आहे) म्हणून हे मुहम्मद (स.), आता तुम्ही त्याच धर्माकडे आमंत्रित करा आणि जशी तुम्हाला आज्ञा दिली गेली आहे त्यावर भक्कमपणे कायम राहा आणि या लोकांच्या इच्छेचे अनुसरण करू नका, आणि यांना सांगा की, ''अल्लाहने जो ग्रंथही अवतरला आहे, मी त्यावर श्रद्धा ठेवली. मला आज्ञा दिली गेली आहे की मी तुमच्या दरम्यान न्याय करावा. अल्लाहच आमचाही पालनकर्ता आहे आणि तुमचा पालनकर्तासुद्धा. आमची कृत्ये आमच्यासाठी आहेत व तुमची कृत्ये तुमच्यासाठी. आमच्या दरम्यान कोणताही तंटा नाही. अल्लाह एके दिवशी आम्हा सर्वांना एकत्र करील आणि त्याच्याकडेच सर्वांना जावयाचे आहे.'' (कुरआन - ४२:१५)

मुळात हीच आहे ती सहिष्णुता व उदारता जी एका सत्यवादी आणि सरळ व परखड स्वभावाच्या व्यक्तीस स्वीकृत व मान्य असू शकते. कारण सत्यनिष्ठ व्यक्ती ज्या मतावर ठाम असते, त्याच मतप्रणालीची स्पष्ट आणि सडेतोड घोषणा करते. इतरांना आपली धारणा वा मतप्रणालीकडे अवश्य आवाहन करतो, मात्र या गोष्टीची पूर्णत: खबरदारी बाळगतो की, कोणाचे मन दुखावले जाऊ नये, कोणाच्याही भावना दुखावल्या जाऊ नये, कोणाविषयीही अपशब्द वापरू नये, कोणाच्याही श्रद्धा अगर आस्थेस ठेस लागू नये, कोणाच्याही पूजा-पाठ आणि कर्मकांडात कोणत्याही प्रकारे बाधा आणू नये, कोणासही आपले मत स्वीकारण्यासाठी दबावतंत्राचा वा आमिषाचा वापर करू नये.

मात्र सत्याला सत्य असल्याचे समजूनसुद्धा सत्य न म्हणणे किंवा मिथ्या व चुकीच्या विचारसरणीस मिथ्या व चूक समजूनसुद्धा मिथ्या व चूक असल्याचे न म्हणणे हे कोणत्याही सत्यनिष्ठ माणसाची भूमिका असूच शकत नाही. साधारणत: सर्वांनाच खूश करण्यासाठी अशा प्रकारची दंभाने बरबटलेली भूमिका अंगीकारणे हे अत्यंत घृणास्पद बाब आहे. अशा प्रकारचा खुशामतीपणा हे केवळ नैतिक दृष्टीनेच घृणास्पद व अपमानास्पद नसून त्यास त्याच्या त्या उद्देशामध्ये सुद्धा यश मिळत नाही, ज्या उद्देशपूर्तीसाठी तो हे घृणास्पद व अपमानकारक काम करतो. कुरआनाने स्पष्टपणे म्हटले आहे,

"यहुदी आणि ख्रिस्ती तुमच्याशी कदापी सहमत होणार नाहीत जोपर्यंत त्यांच्या पद्धतीने तुम्ही वागणार नाही. त्यांना स्पष्टपणे सांगा की अल्लाहने सांगितलेला मार्गच योग्य आहे. अन्यथा तुझ्याकडे आलेल्या ज्ञानानंतर जर तू त्यांच्या इच्छांचे अनुसरण करशील तर अल्लाहच्या प्रकोपापासून वाचविणारा तुझा कोणीही मित्र किंवा सहाय्यक असणार नाही. ज्या लोकांना आम्ही ग्रंथ दिले ते अशा रीतीने त्याचे अध्ययन करीत आहेत जसे त्यांनी करायला हवे. ते ह्यावर मन:पूर्वक श्रद्धा ठेवतात. परंतु जे त्याच्याशी द्रोह करतील तर त्यांनाच नुकसान सोसावे लागेल." (कुरआन - २ : १२० ते १२१)

लबाड सहिष्णुता आणि दंभाने बरबटलेली उदारता आज आपल्याला सर्वत्र पाहायला मिळत आहे. राजकारण करण्यासाठी आणि सत्ता भोगण्यासाठी खऱ्या उदारता आणि सहिष्णुतेचा बळी देऊन लाळघोटेपणा करण्याची वृत्ती आज सर्वत्र बोकाळलेली दिसते. शिवाय अशा लाळघोटेपणाची सहिष्णुता आज वैध आणि आवश्यक मानण्यात येत आहे. कारण पाश्चात्य राजकारणी आणि शासकांच्या अहोरात्र प्रयत्नांमुळे नीतीमत्ता आणि राजकारणात फारकत झाली आहे, दोहोंचा परस्पर-संबंध संपुष्टात आला आहे. याला बराच काळसुद्धा लोटला आहे. मात्र खऱ्या अर्थाने त्या संशोधकांवर किव येते, ज्यांनी आपली अक्कल आणि बुद्धी कोठे तरी गहाण ठेवून आपल्या धार्मिक अनुसंधानात एक अतिशय विलक्षण दृष्टिकोन मांडला. हा दृष्टिकोन कोणता? तर म्हणे "सर्वच धर्म सत्य होय!" अशा स्वरुपाचे विलक्षण ब्रिदवाक्य सामान्यतः अशा लोकांकडून ऐकावयास मिळते, जे असा दावा करतात की आम्ही जोपर्यंत एखादी गोष्ट बुद्धी आणि विवेकाच्या कसोटीवर पारखत नाहीत, तोंपर्यंत कोणतीही गोष्ट मुखावाटे बाहेर काढत नाहीत. मात्र बुद्धी आणि विवेकाच्या कसोटीची अवस्था एवढी दयनीय आहे की, त्यात त्यांच्या या विचित्र संशोधनास कवडीमात्र वजन नाही. ज्या वेगवेगळ्या अगर परस्पर-भिन्न धर्मांना सत्याधारीत असण्याचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे, त्या धर्माच्या नियमांत असणारे आकाश-पाताळाचे अंतर स्पष्टपणे दिसते.

एकजण म्हणतो की ईश्वर एकच आहे. दुसरा म्हणतो की ईश्वर दोन आहेत. तिसरा म्हणतो की, ईश्वर तीन आहेत. चौथा म्हणतो की, असंख्य शक्ती ईश्वरी अस्तित्वात भागीदार आहेत. तर पाचव्याच्या शिकवणीत ईश्वराचे अस्तित्वच नाकारण्यात आलेले आहे. मग शेवटी खरे मानायचे कोणाला? या पाचही विचारसरणी आणि पंचांच्या मुखांतून निघणारे पाचही परस्पर भिन्न विचार कोणत्या आधारावर खरे मानता येतील?

एकजण मानवास ईश्वराच्या स्थानी बसवितो. दुसरा ईश्वरास खाली ओढून माणसांच्या रांगेत उभा करतो. तिसरा मानवास उपासक आणि दास तसेच ईश्वरास पूज्य आणि उपास्य ठरवितो. चौथा येतो आणि पूज्य व पुजारी या दोन्ही कल्पना नाकारतो. मग या चारही कल्पना कोणत्या आधारांवर खऱ्या मानायच्या?

एकजण म्हणतो की क्षमा, मुक्ती हे केवळ कर्मावर आधारित आहे. दुसरा म्हणतो की, मुक्तीसाठी केवळ श्रद्धाच पुरेशी आहे. मग आणखीन तिसरा म्हणतो की, आस्था आणि कर्म या दोन्ही बाबी मुक्तीसाठी आवश्यक आहेत. मग शेवटी या तिघांच्याही भूमिका कोणत्या आधारावर खऱ्या असू शकतात?

एकाच्या दृष्टीत मुक्तीचा मार्ग हा माणसाच्या वर्तमान जीवनाच्या बाहेरून निघतो. दुसऱ्याच्या मते मुक्तीचा मार्ग हा जग आणि त्याच्या जीवनाच्या दरम्यानमधून जातो. मग या दोन्ही विचारसरणी समानरुपाने सत्य असू शकतात काय?

अशा या परस्परविरोधी असलेल्या सर्वच गोष्टींना सत्य असण्याचे प्रमाणपत्र प्रदान करणाऱ्या वस्तूचे नाव जर बुद्धी असेल तर मग परस्परविरोधी असणाऱ्या गोष्टीं एके ठिकाणी एकत्रित होणे हे अशक्य ठरविणाऱ्या गोष्टीचे काही दुसरेच नाव असावयास हवे.

विविध धर्मांमध्ये बऱ्याच गोष्टी आणि विचारांत साम्य असले तरी वरकरणी आणि संकुचित व संकिर्ण दृष्टी ठेवणाऱ्या तथाकथित विचारवंत आणि संशोधकांची शोध-बुद्धी या साम्य असलेल्या गोष्टींपर्यंत पोचत नाही आणि केवळ वरवरुन ओझरती दृष्टी टाकून काही चुकीच्या बाबी चुकीच्या पद्धतीने रचून चुकीचा निष्कर्ष काढतात, हे मोठेच दुर्दैव म्हणावे लागेल. खरे पाहता विभिन्न धर्मांतील समान विचार आणि समान गोष्टीं एका अत्यंत महत्त्वपूर्ण सत्याकडे मानवाचे मार्गदर्शन करतात. एवढेच नव्हे तर विभिन्न धर्मातील या काही समान विचारसरणी हेच वास्तव सिद्ध करतात की समस्त

धर्मांचे मूळ एकच आहे, या समस्त कल्पना आणि शिकवणींचे मूळस्त्रोत एकच आहे, प्राप्त होणाऱ्या या ज्ञानांचे एकच माध्यम आहे, याच एकमेव माध्यमाने विविध देशांना, विविध राष्ट्र आणि समुदायांना, विविध काळ आणि भाषांमध्ये या संयुक्त वास्तविकांचे दर्शन घडविले.

पूर्व ते पश्चिम एवढे अफाट अंतरावर वास्तव्य करीत असलेल्या आणि शकडो वर्षांचे प्रचंड अंतर असलेल्या काळातील लोकांना कोणती ना कोणती तरी एक गोष्ट अशी आहेच, जी सर्वांसाठी एकाच स्वरुपाची सिद्ध झाली, तिचे परिणामसुद्धा एकाच प्रकारचे झाले, हे विशेष मात्र एकच मूळ आधार आणि एकच मूळ स्त्रोत असलेले धर्म जेव्हा आपल्या मूळ आधार आणि मूळ स्त्रोतांपासून दूर होत गेले, तेव्हा त्याने काही बाह्य कल्पना आणि नव-नवीन व अपरिचित धारणा व शिकवणींनी त्यात आपले बस्तान बसविले आणि धर्म भेसळयुक्त झाला. यानंतरच्या नवीन गोष्टी मुळातच त्या संयुक्त स्त्रोत आणि संयुक्त तत्त्वदर्शितापूर्ण गोष्टीपासून प्राप्त झालेल्या बाबी नसून विविध स्वभाव, वेगवेगळ्या प्रवृत्ती आणि विविध प्रकारच्या ज्ञानात्मक आणि बौद्धिक दर्जा असणाऱ्या लोकांनी स्वत: रचलेल्या होत्या. आणि यामुळेच त्यांनी या संयुक्त आधारांवर ज्या धार्मिक इमारती उभ्या केल्या, त्या रंगरूप आणि रचनात्मकदृष्ट्या परस्पर भिन्न झाल्या.

म्हणून विविध धर्मांतील सत्य-शिकवणी ओळखून घेण्यासाठी एकच पर्याय आहे आणि तो म्हणजे सर्वच धर्मांतील समान रूपी असलेल्या विचारसरणी आणि शिकवणी जाणून घ्याव्या, त्यावर संशोधात्मक अभ्यास करायचा. कारण या विविध आणि विस्तृत रूपे आणि परिस्थितींवर आधारित असलेल्या विस्तारित धर्मांचा अभ्यास सत्यापर्यंत पोहचू शकत नाही. कारण 'सत्य' हा एक अत्यंत व्यापक स्वरुपाचा शब्द आहे. त्याच्या अवयवांतसुद्धा किंचितही तफावत आढळत नाही. ज्याप्रमाणे आपण काळा आणि पांढरा, लाल आणि हिरव्यासाठी 'रंग' हा शब्द समानरुपाने वापरु शकतो, त्याप्रमाणे ईश्वर हा एक आहे, दोन आहेत, तीन आहेत आणि कोट्यवधी आहेत, या समस्त विभिन्न बाबी आणि परिस्थितींना 'सत्य' म्हणू शकत नाही.

कुरआनाने स्पष्टपणे वारंवार म्हटले आहे की, समस्त धर्मांचे मूळ एक आहे आणि एकच 'सत्य' आहे जे विविध राष्ट्रांवर विविध काळात अवतरित वा प्रकट करण्यात आले आहे. हे सत्य मानवजातीपर्यंत पोचविण्याच्याच एकमेव उद्दिष्टानुसार प्रत्येक राष्ट्रात आणि प्रत्येक काळात प्रेषित पाठविण्यात आला आहे.

"आम्ही प्रत्येक समुदायात प्रेषित पाठविला आहे."
(कुरआन - १६:३६)

"जेवढे समुदाय होऊन गेले, त्यांत निश्चितच एक सचेतकर्ता (प्रेषित) पाठविला." (कुरआन - ३५:२४)

ईश्वराकडून पाठविण्यात आलेल्या समस्त प्रेषितांच्या संदेशाचा मूळ स्रोत एकच होता. कुरआनात म्हटले आहे,

"(हे प्रेषित मुहम्मद (स.)!) तुमच्यापूर्वी बऱ्यांच प्रेषितांना नाकारले गेले, ज्यांनी स्पष्ट संकेत, दिव्य पुस्तिका (ईश-ग्रंथ) आणि प्रकाशमान ग्रंथ आणले होते." (कुरआन - ३:१८४)

"निश्चितच आम्ही आपल्या प्रेषितांना स्पष्ट प्रमाणासह पाठविले आणि त्यांच्यासोबत ग्रंथ आणि तुळा (न्याय) अवतरित केली, जेणेकरून लोकांनी न्यायावर कायम व्हावे." (कुरआन - ५७:२५)

ईश्वराने पाठविलेल्या सर्वच प्रेषितांचा संदेश एकच होता, तो असा की,

"(हे प्रेषित मुहम्मद (स.)!) आम्ही तुमच्यापूर्वी जेवढे प्रेषित पाठविले, त्यांना हीच प्रकाशना केली की, 'माझ्याशिवाय कोणीही पूज्य-प्रभू नाही.' करीता तुम्ही माझी बंदगी (उपासना, पूजा) करा." (कुरआन - २१:२५)

समस्त प्रेषितांपैकी कोणीही हा दावा केला नाही की, आम्ही जो संदेश अगर शिकवणी सादर करीत आहोत, तो संदेश अगर शिकवणी आम्ही स्वतः आमच्या बुद्धी आणि विवेकानुसार रचलेल्या आहेत. उलट समस्त प्रेषितांनी हेच म्हटले आहे की, आम्ही सादर करीत असलेला संदेश व शिकवणी मुळात ईश्वराकडूनच आहेत. याविषयी कुरआनात म्हटले आहे,

"आमच्यात याचे सामर्थ्य नाही की, तुमच्यासमोर एखादे प्रमाण सादर करावे. हे तर केवळ ईश्वरी आदेशावरच शक्य आहे आणि जे श्रद्धावंत आहेत, ते तर ईश्वरावर विश्वास ठेवतात. मग शेवटी आपण ईश्वरावर का विश्वास ठेवू नये, ज्याअर्थी त्याने आपल्याला मार्ग दाखविला आहे?"

(कुरआन - १४ : ११,१२)

शिवाय या समस्त प्रेषितांपैकी कोणीही असे म्हटले नाही की, लोकांनी त्यांची (स्वतः प्रेषितांची) उपासना करावी. उलट समस्त प्रेषितांनी एकच शिकवण दिली की, एकाच ईश्वराचे उपासक आणि भक्त व्हा. ही बाब कुरआनात अशा शब्दांत स्पष्ट करण्यात आली आहे,

"कोणत्याही माणसाचे हे काम नव्हे की, ईश्वराने त्यास ग्रंथ, आज्ञा व प्रेषितत्व प्रदान करावे आणि त्याने लोकांना म्हणावे की, ईश्वराऐवजी तुम्ही माझे दास व्हा. तो तर हेच म्हणेल की खऱ्या अर्थी रब्बानी (केवळ ईश्वराचाच दास) बना." (कुरआन - ३:७९)

अशा प्रकारे समस्त राष्ट्रांना विविध काळांमध्ये प्रेषितांमार्फत अर्थात खऱ्या धार्मिक नेत्यांमार्फत देण्यात आलेल्या शिकवणी समान स्वरुपाच्या होत्या.

कुरआनात ही गोष्टदेखील स्पष्टपणे मांडण्यात आली आहे की, जगाच्या प्रारंभी काळात समस्त मानव हे केवळ एकच समुदाय होते. अर्थात ते एकाच विशुद्ध मानवी स्वभावाच्या अधीन होते. त्यांच्याकडे ईश्वराकडून सत्य-मार्गाचे ज्ञान आले होते. हे तथ्य चांगल्याप्रकारे मन-मस्तिष्कावर ठसविण्याची गरज आहे की, आजच्या काळातील प्रगतीशील आणि प्रस्तुत इतिहास ऐवजी कुरआनाचे असे स्पष्टीकरण आहे की, या जगाच्या पाठीवर मानवजातीचा आरंभ अज्ञानाच्या अंधकारात झालेला नसून ईशप्रदत्त ज्ञानाच्या स्वच्छ आणि उज्जवल प्रकाशात झाला होता. ईश्वराने जगाच्या पाठीवरील सर्वांत पहिले मानव अर्थात माननीय आदम (अ.) यांना प्रेषित बनविले होते. (आजपर्यंत प्रचलित असलेला 'आदमी' हा शब्द मुळात आपल्याकडे इस्लामी संस्कृतीतूनच आलेला असून आदम (अ.) ची संतती असल्यानेच मानवास आदम अर्थात

मानव आहे म्हणतात) त्यांना ईश-प्रकाशनाद्वारेच असे ज्ञान देण्यात आले होते. जे या भूतलावर सार्थक आणि सफल जीवनासाठी आवश्यक होते, अर्थात इस्लाम! मग कालांतराने मानवांदरम्यान मतभेद सुरु झाले. काही लोकांनी आपल्या मर्यादा ओलांडण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या निसर्गदत्त दर्जापेक्षा उच्च दर्जा प्राप्त करण्यासाठी तसेच आपल्या निसर्गदत्त अधिकारांपेक्षा जास्त अधिकार हाती घेण्याचे प्रयत्न सुरु केले. याच विषम व अनैसर्गिक परिस्थितीचा समतोल कायम करण्यासाठी ईश्वराकडून प्रेषितांना पाठविण्याचा क्रम सुरु झाला, जेणेकरून लोकांना सत्याचे ज्ञान व संदेश द्यावे आणि सामाजिक न्याय स्थापन करावा. या जगात येऊन गेलेल्या समस्त प्रेषितांनी हीच मोहीम राबविली. ज्या लोकांनी ही मोहीम वा संदेश स्वीकारला. तसेच प्रेषितांनी सादर केलेल्या शिकवणी आत्मसात करून त्यांच्या विधानानुसार जीवन व्यतित केले, केवळ तेच सत्य-मार्गाचे ध्वजवाहक ठरले आणि बाकी सर्व मार्गभ्रष्ट ठरले. ज्यांनी प्रेषितांच्या संदेश व शिकवणी नाकारल्या ते चुकीच्या मार्गावर तर गेलेच शिवाय ज्यांनी प्रेषितांच्या शिकवणी आपल्या मनाप्रमाणे व आपल्या इच्छेच्या अधीन करून जीवन व्यतीत केले, तेदेखील असत्य आणि चुकीच्या मार्गावर गेले. कुरआनाने स्पष्टपणे म्हटले आहे,

"वस्तुतः सर्वच मानव एकच समुदाय होते. मग वेगवेगळे झाले."

(कुरआन - १०:१९)

आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"प्रारंभी लोकांचा एकच समूहसमाज होता. तेव्हा अल्लाहने प्रेषित पाठविले शुभवार्ता देणारे आणि सावधान करणारे, आणि त्यांच्यासोबत ग्रंथ अवतरले निर्णय करण्यासाठी ज्यामध्ये ते मतभेद करीत होते. आणि मतभेद त्यांनी केला ज्यांना सत्याचे ज्ञान दिले होते. त्यांनी स्पष्ट मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर आपसांतील दुराग्रहामुळे त्यांमध्ये मतभेद केले. ज्यांनी ईमान धारण केले त्यांना अल्लाहने आपल्या हुकुमाने तो सत्यमार्ग दाखविला ज्यामध्ये लोकांनी मतभेद केला होता. अल्लाह ज्याला इच्छितो त्याला मार्ग दाखवितो." (कुरआन - २:२१३)

आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"आम्ही प्रेषितांना स्पष्ट आदेशांसहित पाठविले आणि त्यांच्याबरोबर ग्रंथ अवतरित केला आणि तुळा (न्याय) दिली, जेणेकरून लोक न्यायाच्या मार्गावर कायम राहावे. आणि आम्ही शासनशक्तीचे ज्ञान दिले, यात मोठी शक्तीसुद्धा आहे आणि लोकांसाठी लाभसुद्धा आहे." (कुरआन - २७:२५)

आणखीन एके ठिकाणी म्हटले आहे,

"मग ज्याने मी प्रदान केलेल्या मार्गदर्शनावर जीवन व्यतीत केले, तो सरळ मार्गापासून कधीही भटकणार नाही आणि त्यावर दुर्दैव ओढावणार नाही. (उलट) जो माझ्या मार्गदर्शनास पाठ दाखवील त्याचे ऐहिक जीवन संकीर्ण होईल आणि परलोकी जीवनात त्यास आंधळा करून उठविण्यात येईल."

(कुरआन - २०:१२३,१२४)

हा कुरआनाचा इतिहासाप्रति दृष्टिकोन आणि इतिहासाची नैतिक व्याख्या आहे, जी सामाजिक विषमतेच्या गुंतागुंतीबरोबरच धार्मिक विभेद आणि विषमतेच्या गुंताड्यास समाधानकारकरितीने सोडवितो. यावरून ही गोष्ट स्पष्ट होते की, जगातील समस्त मानव-समुदायांकडे ईश्वराने याच उद्दिष्टपूर्तीसाठी प्रेषित पाठविले आहेत की, या मानवसमुदायांनी ज्या निसर्गदत्त जीवन मार्गापासून बंडखोरी करून चुकीचा आणि भ्रष्ट मार्ग निवडला होता, त्याच सत्यनिष्ठ आणि प्राकृतिक जीवनमार्गाकडे परत यावे आणि त्यांना सत्य व न्यायाच्या मार्गावर आणावे. मात्र त्यांना पथभ्रष्ट करणारी त्यांची बंडखोरी वारंवार उफाळत गेली आणि लोकांना वारंवार चुकीच्या मार्गावर नेत राहिली. तरीसुद्धा थोडेफार सत्यविचार आणि नैतिकतेच्या विचारसरणी व नियम जगातील विभिन्न मानवसमुदायांत बाकी राहिले. हे सर्वकाही ईश्वराने पाठविलेल्या प्रेषितांच्या शिकवणींचा उरला-सुरला प्रभाव असून आपल्या शक्तीच्या आधारावर विविध मानवसमुदायांच्या मन-मस्तिष्क आणि जीवनात घर करून बसलेला आहे.

यानंतर कुरआनाने जो दावा सादर केलेला आहे, तो असा की,

इस्लाम हा काही नवीन धर्म अगर जीवनव्यवस्था नसून तोच 'मूळ धर्म' आहे जो जगाच्या प्रारंभापासून समस्त मानवसमुदायांसमोर ईश्वराचे सर्व प्रेषित सादर करीत आले आहेत. अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांनी काही नवीन आणि निराळा धर्म सादर केलेला नाही, जो भूतकाळात कधी एखाद्या प्रेषिताने सादर केलेलाच नसेल. हीच बाब कुरआनात अशा शब्दांत स्पष्ट करण्यात आली आहे,

"हे प्रेषिता (स.)! त्यांना सांगा की, मी काही नवीन आणि निराळा संदेश सादर करीत नाही." (कुरआन - ४६:९)

त्यांचा संदेशसुद्धा तोच आहे, जो ईश्वराच्या प्रत्येक प्रेषिताने प्रत्येक काळात, प्रत्येक मानवसमुदायासमोर सादर केला आहे. कुरआनात म्हटले आहे,

"(हे अंतिम प्रेषित (स.)!) आम्ही तुमच्याकडेसुद्धा तीच प्रकाशना पाठविली आहे, जी प्रेषित नूह (अ.) आणि त्यांच्यानंतरच्या प्रेषितांवर पाठविली होती." (कुरआन - ४ : १६३)

हा ईश्वरी संदेश जगाच्या समस्त भूतलावरील प्रत्येक मानवसमूहाकडे प्रेषितांच्या माध्यमाने ईश्वराने पाठविला आहे. अरब, इजिप्त, ईरान, भारत, चीन, जपान, अमेरिका, यूरोप, आफ्रिका आणि या जगाच्या पाठीवर असलेल्या प्रत्येक भागात ईश्वराने सत्यसंदेश पाठविला आणि पृथ्वीचा कोणताही भाग यापासून वंचित ठेवला नाही. सर्वच ठिकाणी ईश्वराचे दूत ईशग्रंथ घेऊन आले. हीदेखील शक्यता आहे की, गौतम बुद्ध, कृष्ण, राम, कन्फ्यूशियस, जरतुश्त, मानी, सॉक्रेटिस वगैरेसुद्धा ईश्वराच्या संदेशवाहक असतील. मात्र अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) आणि इतर प्रेषितांत फरक हा आहे की, इतरांच्या शिकवणी लोकांनी भेसळ केल्यामुळे लुप्त झाल्या, आपले मूळ स्वरुप हरवून बसल्या, मात्र अंतिम प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सादर केलेल्या शिकवणी आजही आपल्या मूळ स्वरुपात सुरक्षित आहेत.

वास्तविक गोष्ट अशी आहे की, इस्लाम हा सर्वच धर्मांपैकी एक धर्म

नसून समस्त मानवजातीचा मूळ धर्म हाच आहे. बाकीचे इतर सर्वच धर्म याच मूळ धर्माचे भेसळयुक्त आणि मूळ स्वरुप हरवलेले आहे. इस्लामेतर धर्मांत जे काही प्रमाणात सत्य आढळते, ते याच मूळ धर्म अर्थात इस्लामचा उरला-सुरला प्रभाव असून हाच मूळ धर्म अर्थात इस्लाम सर्वच मानवजातीकडे पाठविण्यात आला होता, मात्र लोकांनी त्यात भेसळ करून त्याचे मूळ स्वरुप लुप्त झाले. दुसऱ्या अर्थाने इस्लामेतर असलेल्या सर्वच धर्मांमध्ये जेवढे अधिक सत्य शेष राहिले, तेवढाच इस्लाम धर्माचा मूळ अंश त्यात शेष राहिला आहे, असे समजावे. मात्र त्यातील शिकवणींपैकी ज्या बाबी इस्लामविरुद्ध आहेत, त्या विभेदपूर्ण बाबी असून त्या सर्व बाबी केवळ मिथ्या आहेत. त्यांना 'सत्य' ठरविणे न्यायाविरुद्ध ठरेल.

आपण चुकीची सहिष्णुता आणि उदारतेचे प्रदर्शन करण्याऐवजी आपल्या समस्त मानवबंधुना स्पष्टपणे सांगावयास हवे की, बंधुनो! पक्षपात, संकीर्णता व संकोच सोडून द्यावा. सत्य आणि असत्याचा घाल-मेल करीत न बसता विशुद्ध सत्याचा स्वीकार करावा. 'सत्य' हे कोणत्या एका वंश अथवा एखाद्या विशिष्ट मानव-समुदायाची वडिलोपार्जित संपत्ती अथवा कोणा विशिष्ट पंथाच्या वा संप्रदायाची जागीर नसून समस्त मानवांचा संयुक्त वारसाधिकार आहे. हा अधिकार विश्वाच्या स्वामी आणि आपणा सर्वांचा निर्माता प्रभु ईश्वराने समस्त देश आणि राष्ट्रांतील पिढ्यांना प्रदान केलेला आहे. इतरांनी जर हा अमूल्य ठेवा वाया घालविला असेल, त्यात भेसळ केली असेल, त्याच्यात सृष्टीपूजा, अन्याय व अत्याचार, कालविले असेल तर हे एक दुर्भाग्यच होते. तुम्हा-आम्हा सर्वांचेच दुर्भाग्य होते. मग या दुर्भाग्यासच चिकटून राहण्याचे कारण काय? केवळ एवढ्याकरिताच ना की तुमचे पूर्वज असे करीत होते?

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी ईश्वरी संदेशाचा हा अमूल्य ठेवा जशास-तसा आपल्यापर्यंत पोचविला आणि यात आजपर्यंत सृष्टीपूजा, कोणत्याही प्रकारचे अन्याय, अत्याचारपूर्ण रीती-रिवाज तसेच भेदभावाचे विखारी द्रव्य

सामील होऊ शकले नाही, हे एक मोठे सौभाग्यच आहे. आपल्या खऱ्या निर्मात्या आणि पालनकर्त्याचे आभार माना आपले कल्याण करण्यासाठी आणि सत्य संदेशाचा लाभ उठविण्यासाठी. संकोच बाळगू नका की, परमेश्वराची ही अनुकंपा, दया व कृपा अरब-वासी एका व्यक्तीच्या माध्यमाने आपल्याला प्राप्त होत आहे. 'सत्य' हे तर विश्वव्यापी अनुकंपेपैकी एक आहे, ज्याप्रमाणे हवा, पाणी, अन्न, प्रकाश यासारख्या इतर बाबीं ईश्वराची विश्वव्यापी अनुकंपा, दया व कृपा आहेत. शेवटी श्वास घेताना केवळ एवढ्यासाठी आपण नाक-तोंड बंद करू की हे वारे पूर्व दिशेकडून येत आहे, पाण्याचा घोट कंठी उतरविण्यासाठी केवळ या कारणास्तव संकोच करीत आहोत की, याचा स्त्रोत आपल्या नव्हे तर इतर ठिकाणाहून येत आहे. प्रकाशाचा लाभ केवळ यासाठी घेत नाही की, ते अमक्याच्या दिव्याचा आहे, तर हे कोणत्या प्रकारचे लक्षण आहे. शेवटी काय कारण आहे की, विशुद्ध सत्याची अनुकंपा, दया नि कृपा आपल्याला अरबवासी प्रेषित मुहम्मद (स.) यांच्याद्वारे प्राप्त होत असल्याने त्यापासून लाभ आपण एवढ्याकरिताच घ्यायला तयार नसावे की, हे सत्य सादर करणारी व्यक्ती आपल्या देशात जन्म घेतलेली नाही? तर बंधुनो! सद्सद्विवेक बुद्धीने पक्षपाती विचारांची कायमची होळी करून, सत्यास उराशी कवटाळणेच आपल्या कल्याणाचा जामीन होय, हीच ईश-दरबारी पाणावलेल्या डोळ्यांनी प्रार्थना करतो.

समाप्त